नुकसानीचे पंचनामे करण्याच्या मदत व पुनर्वसन मंत्र्यांच्या सूचना

## गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेली नुकसानभरपाई शासन निणर्यानुसार -एकनाथराव खडसे

मुंबई, दि.१ : राज्यात विविध भागांमध्ये मागील दोन दिवसापासून अवकाळी, गारपीट आणि वादळाने सुमारे ५५ जनावरे व वीज पडून सहा व्यक्तींचा मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या भांगामध्ये घरे अथवा मालमत्तेचे कोणतेही नुकसान झालेले नाही. केंद्र शासनाच्या धोरणानुसार ३३ टक्के नुकसान झाल्यास मदत देण्यात येते. तसेच शासन निर्णयानुसार येत्या आठ दिवसाच्या आता मदत देण्यात येईल. याकालावधीतझालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज येथे दिली.

मंत्रालयात आयाजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे उपस्थित होते. गारपीट व वादळ यामुळे झालेल्या नुकसानीची माहिती देताना श्री.खडसे म्हणाले की, औरंगाबाद विभागातील नांदेड जिल्ह्यात ९ लहान व ३ मोठी जनावरे मिळून एकूण १२ जनावरेआणि एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. बीड जिल्ह्यात २ मोठी, लातूर जिल्ह्यात १ मोठे तसेच उस्मानाबाद जिल्ह्यात १ मोठ्या जनावरासह ६ लहान जनावरे मृत्यूमुखी पडली आहेत. तसेच भंडारा जिल्ह्यात वीज पडून म्हशीचे रेडकू व २२ शेळ्यांचा मृत्यू झाला आहे. नाशिक जिल्ह्यातील एक बैल व धुळे तालुक्यातील एक बैल, बुलढाणा जिल्ह्यात १ गाय व १ वासरूचा मृत्यू झाला आहे.

औरंगाबाद विभागातील आठ जिल्ह्यात मागील दोन दिवसापासून अवकाळी पाऊस पडजो आहे. यामध्ये औरंगाबाद ०.०४ मी.मी, जालना ०.४६ मी.मी, परभणी ६.८६ मी.मी, हिंगोली १०.३६ मी.मी, नांदेड ९.०७ मी.मी, बीड ८.११मी.मी, लातूर १९.१३ मी.मी आणि उस्मानाबाद १२.१५ मी.मी तसेच नाशिक जिल्ह्यातील मालेगाव २ मी.मी, नांदगाव ५ मी.मी, धुळे ६ मी.मी, यावला ४.३ मी.मी, मुक्ताईनगर ०.७ मी.मी, अहमदनगर जिल्ह्यातील अकोले ३५ मी.मी, राहुरी ८.४मी.मी, अहमदनगर २ मी.मी, पाथर्डी २१ मी.मी आणि जामखेड २.३ मी.मी आणि अमरावती विभागात १४ मी.मी पाऊस पडला आहे.

नाशिक विभागामधील मालेगांव शहरात अंगावर झाड पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे तर अहमदनगर जिल्ह्यातील अकोला तालुक्यात वीज पडल्याने एकाचा व धुळे जिल्ह्यात

बारा वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे वर्धा जिल्ह्यातील सात व गोंदिया जिल्ह्यातील २१ घरांचे अंशत : नुकसान झाले आहे तर अमरावती, अकोला व यवतमाळ जिल्ह्यात रब्बी पिकांचे व फळपिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. अमरावती विभागातील १७ गावे बाधित झाली आहेत. तर वाशिम जिल्ह्यातील १३ गावांचे, अमरावती विभागातील ६१ गावांचे, यवतमाळ जिल्ह्यातील ५९ गावांचे नुकसान झाले आहे.

अवकाळी पाऊस व गारपीट आणि वादळ यामुळे होणारे नुकसानाची मदत आठवडयाच्या आत देण्यात येईल. यामध्ये कोरडवाहू क्षेत्रासाठी दोन हेक्टर पर्यंत प्रती हेक्टर सहा हजार रुपये, बागायती क्षेत्रासाठी व फळपिकासाठी १३ हजार रुपये प्रती हेक्टर, बहुवार्षिक फळपिकांसाठी १८ हजार रुपये प्रती हेक्टर मदत देण्यात येईल. तसेच पशुधनाच्या नुकसानापोटी प्रती म्हैस, गाय यासाठी ३० हजार रुपये, घोडा, बैल यासाठी २५ हजार रुपये, गाढव, रेडूक याकरिता १५ हजार रुपये, डुकर, प्रती शेळी आणि मेंढी यासाठी तीन हजार रुपयांची मदत करण्यात येईल. ही मदत एका कुटुंबातील ५ जनावरापर्यंत मिळेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

oooooo